# जागवू संवेदना

८ मार्च जागतिक महिला दिन. या निमित्ताने प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अविभाज्य परंतु कायमच बोलण्यातून टाळल्या गेलेल्या विषयावर आता उघडपणे चर्चा व्हायला हवी किंबहुना पॅडमन सिनेमामुळे ती सुरवातही झाली आहे. तो विषय म्हणजे 'मासिक पाळी'. एखाद्या स्त्रीचा विचार केला तर तिच्या आयुष्यातील एकंदरीत ६ ते ७ वर्ष पाळीच्या दिवसात जातात आणि तरीही या विषयाची चर्चा कायमच टाळली जाते.

स्त्री ही नवीन पिढीची निर्माती आहे त्यामुळे तिच्या आरोग्याची काळजी घेणे ही आपलीही जबाबदारी आहे. या दिवसात प्रत्येक स्त्रीला स्वच्छ व आरामदायी पॅड मिळायला हवेत परंतु आपल्या आजूबाजूला पाहिल्यास आपल्याला अशा अनेक मुली व स्त्रीया दिसतील की ज्यांनी आजपर्यंत सनिटरी पॅड कधी पहिले देखील नाही. अस्वच्छ कापड वापरल्याने, त्याची नीट स्वच्छता न ठेवल्याने होणाऱ्या आजारांचे प्रमाणही मोठे आहे.

आपण आपल्या परीने मदतीचा एक हात पुढे करूया. आपण आपल्यासाठी पॅड विकत घेताना आपल्या मोलकरणीसाठी किंवा आजूबाजूच्या परिसरातील गरजू मुलींसाठी देखील एक पॅक विकत घेऊया असे आवाहन
टी.बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन यांनी केले आहे